**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा -राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ जून, २०२०.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम.**

क्रमांक बीआरएल. ०६२०/प्र.क्र.७६(२)/राउशु-३,—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास असे वाटते की, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणावेत आणि म्हणून हे नियम, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा पंचवीस) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे आधी प्रकाशित न करता तात्काळ अंमलात आणावे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम १४३ चे पोट-कलम (२) च्या खंड (ब) नुसार तरतूद केल्याप्रमाणे व प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून याद्वारे महाराष्ट्र शासन, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे ते असे :—

१. या नियमांना, मुंबई विदेशी मद्य नियम (सुधारणा) नियम, २०२० असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ (यात यापुढे ज्याचा "प्रधान नियम" असा निर्देश करण्यात आला आहे.) मधील खंड (७) च्या नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येत आहे.

"(७-अ)—"ग्राउलर" म्हणजे बिअर साठविण्याकरिता एक लिटरपेक्षा जास्त पण पाच लिटरपेक्षा कमी अशा योग्य फूड ग्रेड दर्जाच्या पदार्थाची बरणी किंवा पात्र ज्यात मायक्रोब्रुव्हरी किंवा खाद्यगृह-ब्रुव्हरी मधून प्राप्त झालेल्या केग्ज मधील बिअर मागणीनुसार अनुज्ञप्तीच्या जागेत भरून तात्पूरत्या स्वरूपात सीलबंद केलेली असेल."

३. प्रधान नियमातील नियम ३० मधील परंतुकानंतर, खालील परंतुक समाविष्ट करण्यात येत आहे ते असे :–

"परंतु, त्याचप्रमाणे नमुना एफएल/बीआर-२ अनुज्ञप्ती अंतर्गत विक्रीसाठी लागणारी बीअर फक्त पाच लिटर परिमाणापेक्षा कमी नसलेल्या पॅकबंद स्वरूपात उत्पादन शुल्क भरून अधिकृत नमुना बीआर-९ वाहतूक पासाखाली मायक्रोब्रुव्हरी किंवा खाद्यगृह-ब्रुव्हरी अनुज्ञप्ती धारण करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकाकडून थेट घेऊ शकेल" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

४. प्रधान नियमातील नियम ४२-अ मधील, उपनियम (२) मधील " सीलबंद बाटलीतून बिअर विक्रीस " या शब्दांनंतर " किंवा ग्राउलर्स किंवा बीअर " हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

५. प्रधान नियमातील नियम ५२ मधील उपनियम (१) मधील दुसऱ्या परंतुकानंतर खालील परंतुक समाविष्ट करण्यात येत आहे, ते असे :–

"परंतु आणखी असे की, एकवीस वर्षांवरील कोणत्याही व्यक्तीस किंवा परवानाधारकास ग्राउलर्स मधून बीअरची सीलबंद विक्री करू शकतील" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

६. प्रधान नियमातील जोडपत्र नमुना एफएल/बीआर-२ मध्ये,–

(अ) अट क्र.१ मध्ये "सीलबंद बाटलीतून बिअर किंवा वाईन किंवा दोन्ही विक्रीकरिता" या शब्दांऐवजी "सीलबंद बाटलीतून वाईन किंवा सीलबंद बाटलीतून बीअर किंवा ग्राउलर्स किंवा दोन्ही मधून विक्रीकरिता" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

(आ) अट क्र.२ मध्ये "सीलबंद बाटलीतून बिअर किंवा वाईन किंवा दोन्ही विक्रीकरिता" या शब्दांऐवजी "सीलबंद बाटलीतून वाईन किंवा सीलबंद बाटलीतून बीअर किंवा ग्राउलर्स किंवा दोन्ही मधून विक्रीकरिता" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

(इ) अट क्र. ३ मध्ये "एफएल-१ अनुज्ञप्तीमधून प्राप्त झालेले" या शब्दांऐवजी "आणि अनुक्रमे नमूना एफएल-१ किंवा मायक्रोब्रुव्हरी अथवा खाद्यगृह-ब्रुव्हरी अनुज्ञप्तीमधून प्राप्त केग्ज" हे शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वल्सा नायर सिंह,**
शासनाच्या प्रधान सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 15th June, 2020.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. BRL. 0620/CR.76(2)/EXC-3.—Whereas the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the provision to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act ( XXV of 1949).

Now, therefore in exercise of the powers conferred by clauses (*b*) of sub-section (*2*) of section 143 of the Bombay Prohibition Act, 1949 and all of the other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules, namely :–

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor (Amendment) Rules, 2020.

2. In rule 3 of the Bombay Foreign Liquor Rules, 1953 (hereinafter referred to as "principal Rules"), after clause (7) , following clause shall be inserted, namely :–

"(*7-a*) "Growler" means a jar or container of at least one litre but not more than 5 litre made of any suitable food grade material to be filled on-premise on order from kegs received from microbrewery or a restaurant-brewery license holders and can be sealed temporarily after storing beer.".

3. In rule 30 of the principal Rules, after the proviso, the following proviso shall be added, namely:–

"Provided further that, beer required for sale under Form FL/BR-II, license may be obtained directly from a person holding microbrewery or a restaurant-brewery license, only in packaged form of not less than 5 litres, after payment of excise duty under a valid transport pass in Form BR-IX.".

4. In rule 42A of the principal Rules, in sub-rule (*2*), after the words "selling beer in sealed bottle" the words "or Growlers or beer" shall be inserted.

5. In rule 52 of principal Rules, in sub-rule (*2*), after the second proviso, the following proviso shall be added, namely :–

"Provided further that, beer in Growlers may be sold to any person above the age of 21 years or permit holder for 'off-consumption'.".

6. In of Form F.L./BR-II appended to the principle Rules,-

(*a*) in the conditions no. 1, for the words "selling beer or wine or both in sealed bottles" the words "selling wine in sealed bottles or beer in sealed bottles or growlers or both" shall be substituted ;

(*b*) in the conditions no. 2, for the words "selling beer or wine or both in sealed bottles" the words "selling wine in sealed bottles or beer in sealed bottles or growlers or both" shall be substituted ;

(*c*) In the condition no. 3, for the words “as obtained under the licence in Form FL-I” the words “and Kegs as obtained under the licence in Form FL-I or from a person holding microbrewery or a restaurant-brewery licence respectively” shall be substituted ;

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VALSA NAIR SINGH,
Principle Secretary to Government.